# जिष्णू देव वर्मा यांनी घेतली राज्यपालपदाची शपथ

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्यपाल पदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृह येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली. शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. जिष्णू देव वर्मा हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.

सुरुवातीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधी नंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.



शपथविधी सोहळ्याला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, अन्न व औषध प्रशासन नरहरी झिरवळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्य राज्य शिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# विधान भवन येथे बुधवारी ११ मार्च रोजी महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासंदर्भात विशेष चर्चासत्र - विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर





**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेले आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ आणि जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी १०.०० वाजता महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासंदर्भात विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रसंगी उपस्थित रहावे असे निवेदन विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी केले. तसेच या चर्चासत्राबाबत विधानपरिषदेत सभापती प्रा.राम शिंदे यांनी निवेदन केले.

संयुक्त राष्ट्र संघटनेने यंदाचे वर्ष हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले आहे. जागतिक अन्न व्यवस्थेत महिलांचे अमूल्य योगदान अधोरेखित करणे आणि शेतीमध्ये त्यांना समान संधी, संसाधने, जमीन अधिकार मिळवून देऊन सशक्त करणे, यासाठी सर्वंकष प्रयत्न केले जाणे अभिप्रेत आहे. या पार्श्वभूमीवर या विशेष कार्यक्रमाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. सौम्या स्वामिनाथन आणि डॉ. नित्या राव यांचे महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासंदर्भात व्याख्यान होईल. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात शेतकरी महिलांना यांना सन्मानीत करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या समिती प्रमुख मोनिका राजळे, वि.स.स. डॉ.ज्योती गायकवाड, वि.स.स. मंजुळा गावित, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे उपस्थित असणार आहेत.

# कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाचे सर्वोतोपरी प्रयत्न - वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन विविध उपाययोजना करत आहे. कांदा हे नाशवंत पीक असल्यामुळे हमी भाव योजनेत त्याचा समावेश नसला तरी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन सकारात्मक निर्णय घेत असल्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य सदाभाऊ खोत यांनी याविषयी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सतेज पाटील, प्रवीण दरेकर, अमोल मिटकरी, हेमंत पाटील, राजेश राठोड, शिवाजीराव गर्जे यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळावा हीच शासनाची भूमिका असल्याचे सांगत मंत्री संजय सावकारे म्हणाले, कांद्याला योग्य बाजारपेठ



मिळावी यासाठी पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल.

मंत्री. सावकारे म्हणाले, राज्यात कांदा उत्पादनाच्या व्यवस्थापन करण्यासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत. नाफेड व एनसीएफडीमार्फत सुमारे २.७७ लाख टन कांद्याची खरेदी करण्यात आली असून ४५० कोटींपैकी ४३० कोटी रुपयांचा परतावा शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. आखाती देशांमध्ये कांदा निर्यातीला काही अडचणी असल्या तरी अन्य देशात निर्यात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री संजय सावकारे म्हणाले, देशातील ज्या राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन होत नाही अशा राज्यांमध्ये महाराष्ट्रातील कांदा विक्रीसाठी प्रयत्न सुरू आहेत. बाजार व्यवस्थापन आणि निर्यात वाढविण्याच्या उपाययोजनांमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच दिलासा मिळेल, असा विश्वासही मंत्री सावकारे यांनी यावेळी व्यक्त केला.

## शिवभोजन योजनेसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही - छगन भुजबळ

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

राज्यातील गरीब आणि गरजू जनतेला सवलतीच्या दरात सकस भोजन उपलब्ध करून देणारी 'शिवभोजन योजना' अधिक सक्षमपणे राबवण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे अन्न,नागरी,पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. आमदार सना मलिक यांनी विधानसभेत याविषयाची लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

अन्न नागरी पुरवठा मंत्री भुजबळ म्हणाले की, सध्या संपूर्ण राज्यात १८७३ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सुधारित अंदाजपत्रकानुसार ₹२२०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी देखील ₹१२० कोटींची भरीव तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. हा निधी प्राप्त होताचा मार्चनंतर निधी वितरीत करणार आहे. शिवभोजन योजनेच्या देयकांचे वितरण उप नियंत्रक शिधावाटप, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या स्तरावर नियमितपणे केले जाते. क्षेत्रीय यंत्रणेला निधी वितरणासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून, लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ निरंतर मिळत राहील याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# सायबर फसवणूक रोखण्यासाठी जनजागृतीकरिता ४३ कोटींची तरतूद - योगेश कदम

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या युगात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, ऑनलाईन गेमिंगमधील आर्थिक गैरव्यवहार आणि ई-चलनांच्या नावाखाली होणारी फसवणूक रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी ४३ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली असल्याची माहिती राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. या मोहिमेअंतर्गत दरमहा राज्यातील नागरिकांना २१ कोटी जनजागृतीपर मेसेजेस पाठवले जाणार आहेत. सदस्य प्रशांत ठाकूर यांनी सायबर सुरक्षेबाबत प्रश्न विचारला होता.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकारने



ऑनलाईन गेमिंगबाबत कडक कायदे केल्यानंतर आता राज्य सरकारनेही त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू केली आहे. विशेषतः पुणे आणि गोवा यांसारख्या भागांत ई-चलन किंवा ई-पीक पाहणीच्या नावाखाली फेक लिंक्स पाठवून मोबाईलमधील डेटा आणि पैसे चोरण्याचे प्रमाण वाढले आहे. यावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्रात देशातील सर्वात मोठे 'सायबर सुरक्षा मुख्यालय' (महापे येथे) उभारण्यात आले आहे. संपूर्ण राज्यामध्ये ५० विशेष सायबर पोलीस स्टेशन कार्यान्वित करण्यात आली असून कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. केवळ 'सीडीआर' काढून गुन्हेगार सापडत नाहीत, त्यामुळे डार्क वेबवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक असणारी आधुनिक 'टूल्स' सरकारने उपलब्ध करून दिली आहेत. नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी 'महा सायबर सेफ' ॲप हे अधिकृत ॲप्लिकेशन लॉंच करण्यात येत आहे. ज्यावर सायबर फसवणुकीच्या विविध पद्धतींची माहिती मिळेल असा विश्वास राज्यमंत्री योगेश कदम यांनी व्यक्त केला.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**जल अभियंता विभाग**

**क्र. कार्य.अभि. (परि.) ज.मा.का./8762 दि. 10/03/2026**

**ई-निविदा सुचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे खालील नमुद विषयांकित कामांसाठी, इच्छुक निविदाकारांकडुन ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा वितरण व विक्री दिनांक आणि वेळ, निविदा विक्री नियत दिनांक आणि वेळ या बाबतचा तपशीलवार बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर आणि महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in निविदा अवलोकन अंतर्गत प्रसिद्ध/अपलोड करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | निविदेचा विषय |
|---|---|---|
| १ | २०२६_एमसीजीएम_१२८३३१६ | सहा. अभि. (परि) जल कामे शहर अंतर्गत विविध आकाराच्या अचूक बनावटीच्या एम एस वस्तूंचा पुरवठा करणे. (निविदा जारी दि. ११.०३.२०२६) |

इच्छुक निविदाकारानी तपशीलवार माहितीकरिता महाटेंडर संकेतस्थळावर अर्थात http://mahatenders.gov.in आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेबसाईट अर्थात http://portal.mcgm.gov.in वर भेट द्यावी.

सही /-
कार्य. अभि. (परि.) ज. मा. का.

पीआरओ/३२३९/जाहि./२०२५-२६

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा

# पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प रहिवाशांच्या प्रश्नावर लवकरच विशेष बैठक - राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

मुंबईतील गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील रखडलेल्या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी लवकरच गृहनिर्माण मंत्र्यांच्या दालनात सर्वसमावेशक बैठक आयोजित करण्यात येईल, असे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत सांगितले. आमदार सुनील प्रभू यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, २००८ साली स्थानिक रहिवाशांनी हा प्रकल्प 'गुरुआशिष' या खासगी विकासकाला दिला होता. मात्र, २०१८ पर्यंत प्रकल्प पूर्ण झाला नव्हता. अशा परिस्थितीत सरकारने पुढाकार घेत म्हाडाच्या माध्यमातून हा प्रकल्प ताब्यात घेतला. म्हाडाने ४९० कोटी रुपये खर्च करून स्थानिक रहिवाशांना हक्काची घरे उपलब्ध करून दिली आहेत. २ एप्रिल २०२५ रोजी प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) मिळाले असून ६७२ पैकी ६२२ पात्र रहिवाशांना वितरणपत्रेही देण्यात आली आहेत.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, इमारतीच्या बांधकामाचे व्हीजेटीआय या नामांकित संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. "संस्थेच्या अंतरिम अहवालानुसार सर्व इमारती रचनात्मक दृष्ट्या सुस्थितीत, मजबूत आणि राहण्यायोग्य आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय**
**Email: integratedmumbai.ee@mahapwd.com**
**दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६**
**ई-निविदा सुचना क्र. ९४ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दुरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४-७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडून योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत **मजूर सहकारी संस्थांकडून (फक्त बृहन्मुंबई शहर)** खालील कामांकरीत "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटलमधील मुख्य इमारतीतील आपत्कालीन कक्षाचे अपग्रेडेशन करणे. | ४९७५४८०/- |
| २ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटलमधील मुख्य इमारतीतील आपत्कालीन कक्षाचे मजबुतीकरण आणि भिंतीचे पॅनेलिंग करणे. | ४९७४३२३/- |
| ३ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटलमधील मुख्य इमारतीतील आपत्कालीन कक्षाला नवीन फरशी टाइल प्रदान करणे. | ४९५०७६७/- |
| ४ | मुंबईतील जीटी हॉस्पिटलमधील मुख्य इमारतीतील आपत्कालीन कक्षाचे प्लास्टर आणि रंगकाम करणे. | ४९०२३१७/- |
| ५ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटलमधील मुख्य इमारतीतील आपत्कालीन कक्षाला नवीन फरशी टाइल प्रदान करणे. | १६७२३३१/- |
| ६ | मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात 'अ' विभागातील रंगकाम आणि प्लास्टरमध्ये बदल आणि सुधारणा, ग्रंथालयाचे प्लास्टर, रंगकाम आणि खिडक्या आणि पहिल्या मजल्यावरील ग्रंथालयाच्या रस्त्याचे फरशी आणि विटांचे काम आणि पहिल्या मजल्यावरील ग्रंथालय आणि वैद्यकीय ग्रंथालयाच्या 'ब' विभागातील फरशी आणि विटांचे काम करणे. | ४१३४३७२/- |
| ७ | मुंबई येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील वाचन कक्षातील दरवाजे, खिडक्या आणि इतर ॲक्सेसरीजचे नूतनीकरण आणि सुधारणा आणि विविध ठिकाणी स्ट्रक्चरल दुरुस्ती आणि 'ब' विभागातील बुक शेल्फ आणि स्टोरेज युनिट आणि 'अ' विभागातील पॅनेलिंग आणि इतर लाकडी काम आणि जीएमसी वाचन कक्षातील शौचालय आणि शौचालयाचे काम करणे. | ४१३२०१७/- |
| ८ | मुंबईतील जी.टी. हॉस्पिटलमधील नोकर चाळ येथील कॉमन टॉयलेट आणि शेडची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | २४५७१६५/- |
| ९ | मुंबईतील एस. जॉर्जेस हॉस्पिटलमधील दुसऱ्या मजल्यावरील मुख्य इमारतीत विविध ठिकाणी फर्निचर, ग्रिल आणि इतर ॲक्सेसरीजमध्ये सुधारणा करणे. | २९९१७६८/- |

**(एकूण ०९ कामे)**
ई-निविदा उपलब्ध कालायची — दिनांक ११/०३/२०२६ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १८/०३/२०२६ रोजी १५.०० पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) — दिनांक १९/०३/२०२६ रोजी १५.०५ वाजता :
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
२. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.एघ (सा.बां.)/निविदा/२२५८**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,**
**बांधकाम भवन, २ रा मजला,**
**२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**
**दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६**
**दिनांक : ०९/०३/२०२६**

सही/-
कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C६४७०

**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ भारत
Phone: +919820648283 | Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00018582 & APPL00019845** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स हायपरट्रॉन लॉजिस्टिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) युनिट क्रमांक ११० आणि १११, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड-४२१२०८, रायगड, महाराष्ट्र, भारत.

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. रवी रमेश यादव (सह-कर्जदार) युनिट क्रमांक ११०, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड - ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (३) श्री. रमेश रामदुलार यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्र. जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (४) कु. प्रियांका रवी यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण-पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड-४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत.

मालमत्तेचा पत्ता: युनिट क्रमांक ११० आणि १११, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड - ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत

| | |
|---|---|
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. २,८८,७७,५१७/- (रुपये दोन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख सत्यातर हजार पाचशे सतरा फक्त) |
| लिलावाची तारीख | ३० मार्च २०२६ |
| राखीव किंमत | रु. १,९९,०७,०००/- (रुपये एक कोटी नव्व्याण्णव लाख सात हजार फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २३ मार्च २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २७ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३० मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.
तारीख: १० मार्च २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता

**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ भारत
Phone: +919820648283 | Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00018582 & APPL00019845** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स हायपरट्रॉन लॉजिस्टिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) युनिट क्रमांक ११० आणि १११, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड-४२१२०८, रायगड, महाराष्ट्र, भारत.

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. रवी रमेश यादव (सह-कर्जदार) युनिट क्रमांक ११०, पहिला मजला, इमारत अ, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जिल्हा रायगड - ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (३) श्री. रमेश रामदुलार यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्र. जी-६, कल्याण - पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड ४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत. (४) कु. प्रियांका रवी यादव (सह-कर्जदार) युनिट क्र. ११०, पहिला मजला, बिल्डिंग ए, स्लिव्हर स्प्रिंग, प्लॉट क्रमांक जी-६, कल्याण-पनवेल रोड, तळोजा एमआयडीसी, तळोजा, पनवेल जि. रायगड-४२१ २०८, रायगड, महाराष्ट्र, भारत.

मालमत्तेचा पत्ता: रोहाऊस नं. ५८-ए, ग्राउंड प्लस ३रा मजला, सेक्टर क्र. १३, रोडपाली, कळंबोली, नवीन पनवेल, जि. रायगड ४१० २०८, ठाणे, महाराष्ट्र, भारत.

| | |
|---|---|
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. २,८८,७७,५१७/- (रुपये दोन कोटी अठ्ठ्याऐंशी लाख सत्यातर हजार पाचशे सतरा फक्त) |
| लिलावाची तारीख | ३० मार्च २०२६ |
| राखीव किंमत | रुपये १,६८,८०,५००/- (रुपये एक कोटी अडूसषठ लाख अंशी हजार पाचशे फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २३ मार्च २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २७ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३० मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.
तारीख: १० मार्च २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,**
**राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, लालबहादूर शास्त्री मार्ग, मुलुंड (प.), मुंबई - ४०० ०८०.**
ई-मेल पत्ता - **elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in** दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२५६०१३२७

**ई-निविदा सूचना क्र. ८३/२०२५-२६.**

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई. हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार लिफाफा क्र. १ अनुसार यांचेकडुन खालील कामांकरिता **ब-१** टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे **Online** मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी / अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रुपये : |
|---|---|
| १. अंदाजपत्रक क्र. २४१०१५/२०२५-२६, नवीन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील वातानुकूलित यंत्रणा, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (१८० केलडी) जनित्र (१५०० के व्ही ए), उद्वाहन, विद्युत उपकेंद्र (१५०० के व्ही ए) चालविण्याकरीता आणि दैनंदिन देखभालीसाठी कुशल चालक व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने पुरविणे. (१८० दिवस) | रूपये ४४६६५२०/- |
| २. अंदाजपत्रक क्र. २४२००८/२०२५-२६, जुने महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील वातानुकूलित यंत्रणा, जनित्र (५०० के व्ही ए), उद्वाहन. एल टी पॅनेल, एवं टी पॅनेल (११ के व्ही), विद्युत उपकेंद्र (५०० के व्ही ए) चालविण्याकरीता आणि दैनंदिन देखभालीसाठी कुशल चालक, मदतनीस, मजदूर, वायरमन व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने पुरविणे. (१८० दिवस) | रुपये ३०८७७२०/- |
| ३. अंदाजपत्रक क्र. २१३०७६/ २०२५-२६ चिल्ड्रेन एड सोसायटी मधील टॉयलेट ब्लॉक, बास्केटबॉल ग्राऊंड, सुरक्षा रक्षक चौकी, माध्यमिक विद्यालय आणि अधीक्षक बंगला येथील खिडक्या व दरवाजे व इमारतीची संरचना मजबूत करणे, अश्या स्थापत्य दुरुस्तीच्या कामासामवेत विद्युत संच मांडणीची दुरुस्ती करणे. | रूपये २९६३८६८/- |
| ४. अंदाजपत्रक क्र. ११३०१४ / २०२५-२६, शासकीय उच्च औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आरती रोड, चेंबूर, मुंबई येथे इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक्स कार्यशाळा, आयओटी टेक्निशियन स्मार्ट सिटी कार्यशाळा, रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग कार्यशाळा, वायरमन कार्यशाळा, इलेक्ट्रिशियन कार्यशाळा मध्ये विद्युत संच मांडणीची दुरुस्ती व नूतनीकरण करणे. | रूपये २११८५९०/- |
| ५. अंदाजपत्रक क्र. १२२०२७/२०२५-२६ (पूर्व), मुंबई-४०००५१ येथील प्रशासकीय इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील परिवहन आयुक्त, मुंबई उपनगर कार्यालयात अतिरिक्त विद्युत संच मांडणी कामात बदल / फेरफार करणे. | रुपये २३९५५९६/- |
| ६. अंदाजपत्रक क्र.१२२०२८/२०२५-२६. वांद्रे (पूर्व), मुंबई येथील प्रशासकीय इमारतीच्या चौथ्या मजल्यावर परिवहन आयुक्तांच्या कार्यालयात नव्याने प्रस्तावित केबिनमध्ये अतिरिक्त वातानुकूलित यंत्रणा बसवणे. | रूपये २२७०७४७/- |
| ७. अंदाजपत्रक क्र. २२३००९/२०२५-२६ बांद्रा, बीकेसी येथील अधिदान व लेखा कार्यालय (तळमजला + ७ मजला), मुंबई - ४०००५१ येथे बसविण्यात आलेल्या VRV स्प्लिट एअर कंडिशनिंग सिस्टम व स्प्लिट एअर कंडिशनिंग युनिट्स यांना ३ वर्षांसाठी संपूर्ण (Fully Comprehensive) वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रूपये १४८३७७६/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि. १०.०३.२०२६ ते दि. १८.०३.२०२६ रोजी १७.३० वा. पर्यंत.**
**ई-निविदा उघडणे : दि. २०.०३.२०२६ रोजी १४.०० वा. नंतर.**
**(महाराष्ट्र शासन, सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दि. १४.०२.२०२५)**
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. वरील अंदाजित रकमेत जी.एस.टी. समाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरतांना जी.एस.टी. वगळून दर नमूद करावा. अंदाजित रकमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रकमेवर जी.एस.टी. १८% पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.
२. **http://mahatenders.gov.in**
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफिकेशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, (मुलुंड), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा. बां. विभाग, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C६४४०